**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला

- मुंबई महानगरपालिकेसाठी महायुतीचा वचननामा, तर नागपूरसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध

- जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना भारतात मात्र अभूतपूर्व स्थैर्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडचं भारतापुढं विजयासाठी ३०१ धावांचं आव्हान

**आणि**

- ज्येष्ठ समाजवादी नेते माजी आमदार गंगाधर पटणे यांचं निधन

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रचार संपण्यासाठी केवळ तीनच दिवस राहिले असून विविध पक्षांनी प्रचारात जोर लावला आहे. जाहीर सभा, रोड शो, तसंच समाज माध्यमांवरदेखील प्रचाराला रंग चढला आहे. मतदानाच्या आधीचा रविवार असल्यानं आज अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न उमेदवार करत आहेत.

मुंबई महापालिका निवडणूकीचा महायुतीचा वचननामा आज मुंबईत प्रकाशित करण्यात आला. यानिमित्त आयोजित वार्ताहर परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले उपस्थित होते. कचरामुक्त

मुंबईसह मुंबईचा पाणी प्रश्न मिटवून मिठी नदी स्वच्छ करण्याचं काम केलं जाईल असं मुख्यमंत्री फडनवीस यांनी यावेळी सांगितलं....

**होल्ड- बाईट- मुख्यमंत्री (२४ सेकंद)**

बेस्ट बस आणि मेट्रोचं जाळं वाढवण्यासह आरोग्य क्षेत्रात भरीव काम करणार असल्याचं सांगून,मुंबईत राहणारा मराठी माणूस बाहेर जणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी, बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी निमित्त वैद्यकीय विद्यापीठ तयार करणार, तसंच लघु उद्योजकांना पाच लाख रुपये बिनव्याजी कर्ज देणार असल्याचं सांगितलं....

**होल्ड- बाईट - उपमुख्यमंत्री शिंदे**

नागपूर महानगरपालिकेसाठी भाजपानं आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. नागपूर जागतिक दर्जाचं शहर बनवण्यासाठी ई- लायब्ररी, ४ स्तरीय वाहतूक, स्कायबस सुविधा, आणि विविध ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचं आश्वासन जाहीरनाम्यात दिलं आहे. लाडकी बहीण योजनेला विरोध करुन काँग्रेसचा खरा चेहरा समोर आला असल्याची टीका भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली. काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी भाजपा धर्माच्या आधारावर राजकारण करत असल्याचा आरोप केला होता. त्याला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, की भाजपाचं राजकारण आध्यात्मिक संस्कृतीच्या धर्तीवर चालतं.

**<><><><><>**

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधे तीस हजार कोटी रुपयांची कामं केली जाणार असून नाशिकच्या भविष्याचा विचार करून विकास केला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं. महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्र्यांची नाशिकमधे प्रचारसभा झाली, त्यावेळी ते बोलत होते.

तपोवनातली झाडं तोडून त्या जागेचा कोणत्याही व्यावसायिक कारणासाठी वापर केला जाणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. त्याचप्रमाणे दळणवळणाची साधनं म्हणजेच रस्त्यांचं रूंदीकरण, नवीन महामार्ग तसंच विमानतळाचं पॅसेंजर टर्मिनल यांचाही विकास केला जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

इतर पक्षांच्या उमेदवारांनीही आज नाशिकमधे पदयात्रेसह विविध माध्यमांचा वापर करत प्रचार केला. तसंच घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला.

**धुळे** महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात आज सर्वपक्षीय उमेदवारांनी जोर लावला. भाजपा नेते जयकुमार रावल, अमरीश पटेल यांनी आज प्रचारसभा घेतल्या. शिवसेनेच्या आमदार मंजुळा गावित अनेक ठिकाणी पदयात्रांमधे सहभागी झाल्या. काँग्रेसच्या खासदार शोभा बच्छाव, यांच्यासह काँग्रेस नेत्यांनी आज मतदारांच्या भेटींवर जोर दिला. माजी आमदार अनिल गोटे यांनीही देवपूर परिसरातल्या सभेला संबोधित केलं. याशिवाय विविध उमेदवार पदयात्रा, मोटारसायकल रॅली काढून तसंच घरोघरी जाऊन प्रचार करत आहेत.

**<><><><><>**

लाडकी बहीण योजनेला काँग्रेसचा विरोध नाही, पण निवडणुका जिंकण्यासाठी भाजपा लाडक्या बहिणींचा वापर करून घेत आहे अशी टीका, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवर यांनी आज अकोल्यात केली. निवडणुकीतल्या आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून निवडणुका घेण्यावरूनही त्यांनी राज्य सरकार आणि निवडणूक आयोगावर निशाणा साधला. एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवेसी भाजपाचीच भाषा बोलतात, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना भारतात मात्र अभूतपूर्व स्थैर्य असून विकसित राष्ट्र होण्याकडे भारताची वेगवान वाटचाल सुरू असल्याचं

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते राजकोट इथे, कच्छ आणि सौराष्ट्र प्रदेशासाठीच्या व्हायब्रंट गुजरात प्रादेशिक परिषदेत बोलत होते.

याप्रसंगी प्रधानमंत्र्यांनी १३ ग्रीनफील्ड स्मार्ट औद्योगिक वसाहतींचं दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन केलं. यावेळी उद्योगपती मुकेश अंबानी, करण अदानी, बी के गोएंका उपस्थित होते. त्याआधी प्रधानमंत्र्यांनी राजकोट इथं, व्हायब्रंट गुजरात व्यापार प्रदर्शनाचं उद्घाटन केलं.

**ते आज दुपारी** सोमनाथ इथं सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले. सोमनाथचा इतिहास हा विजय आणि पुनर्निर्माणाचा तसंच आपल्या पूर्वजांच्या पराक्रम, त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. आपल्या पूर्वजांनी प्राणाचं बलिदान देऊन सोमनाथ मंदिराचं रक्षण केलं, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत लाल बहादूर शास्त्री यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त आज उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपतीभवनात त्यांना पुष्पांजली अर्पण केली. लाल बहादूर शास्त्री यांचं जीवन साधेपणा, सचोटी आणि देशाप्रती असलेल्या अढळ निष्ठेचं प्रतीक आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावर दिलेल्या आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

भारतीय क्रिकेट संघाच्या यंदाच्या हंगामाचा प्रारंभ करणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत, आज वडोदरा इथं सुरु असलेल्या पहिल्या सामन्यात, न्यूझीलंडनं भारतापुढं विजयासाठी ३०१ धावांचं आव्हान ठेवलं आहे. भारतानं नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. न्यूझीलंडनं निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून ३०० धावा केल्या.

भारतातर्फे मोहमद सिराज, हर्षीत राणा, आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी दोन, तर कुलदीप यादवनं १ गडी बाद केला.

मालिकेतला दुसरा सामना येत्या बुधवारी १४ जानेवारी रोजी राजकोट इथं, तर तिसरा आणि अंतिम सामना १८ जानेवारी रोजी इंदूर इथं होणार आहे.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये, दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स यांच्यातला सामना आज नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील मैदानावर रंगणार आहे. संध्याकाळी साडेसात वाजता खेळ सुरु होईल.

<><><><><>

जनता दलाचे माजी आमदार आणि ज्येष्ठ समाजवादी नेते गंगाधर पटणे यांचं आज नांदेड इथे वृद्धापकाळानं निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. पटणे १९९८ ते २००४ या कालावधीत विधानपरिषदेचे माजी सदस्य होते. १९७४ ते १९८१ या काळात ते बिलोली नगरपरिषदेचे नगराध्यक्ष होते.

साने गुरुजी आणि महात्मा बसवेश्वर यांच्यावर निष्ठा असलेले, ग्रंथालय चळवळीचा आधारस्तंभ, शिक्षणप्रेमी नेते अशी त्यांची ओळख होती. पटणे यांनी देहदानाचा संकल्प केला होता. त्यांचं पार्थिव श्री गुरुगोविंद सिंघजी वैद्यकीय महाविद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आलं आहे.

<><><><><>

विद्यमान आर्थिक वर्षात, देशाची वित्तीय तूट स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्क्यापर्यंत रोखण्याचं उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता असल्याचं, पीडब्ल्यूसी या पतमानांकन संस्थेच्या अहवालात म्हटलं आहे. ही तूट यापेक्षाही कमी राहील, आणि यामुळे आर्थिक व्यवस्थापनातली भारताची मजबूत स्थिती जागतिक पातळीवर अधोरेखित होत असल्याचं, या संस्थेचे प्रतिनिधी राणेन बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं नुकतंच जीडीपी दरवाढीचं उद्दिष्ट १० पूर्णांक १ दशांश टक्क्यावरून ८ टक्क्यावर आणल्यानं, वित्तीय तूट कमी ठेवण्याचं उद्दिष्ट सरकार पूर्ण करू शकेल का, याबद्दल साशंकता निर्माण झाली होती. मात्र एकंदर आकडेवारी, अर्थसंकल्पातल्या अंदाजाइतकीच आहे, त्यामुळे वित्तीय तूट रोखण्याचं लक्ष्य सहज पूर्ण होईल, असा विश्वासही बॅनर्जी यांनी व्यक्त केला.

<><><><><>

बंगळुरू इथं झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेत मुंबई विद्यापीठानं तृतीय क्रमांक पटकावला आहे. मुंबई विद्यापीठाच्या महिला संघानं अखिल भारतीय स्तरावर प्रथमच पदक पटकावलं. या कामगिरीच्या जोरावर संघाची खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठीही निवड झाली आहे.

<><><><><>

राजमाता जिजाऊ यांच्या उद्या होणाऱ्या जयंती उत्सवाच्या निमित्तानं, बुलडाणा जिल्ह्यातल्या खामगाव इथून 'संस्कार ज्योत' रथयात्रा मातृतीर्थ सिंदखेडराजाकडे आज रवाना झाली. 'अहिल्या, सावित्री, रमाई संस्कार ज्योती यात्रा' या नावानं निघालेली ही रथयात्रा, सर्वधर्मसमभावाचा संदेश देत आहे. या निमित्त खामगाव इथल्या छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर असलेल्या अश्वारूढ पुतळ्याला आणि राजमाता जिजाऊंच्या पुतळ्याला नगराध्यक्ष अपर्णा फुंडकर यांच्यासह मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. त्यानंतर शिवभक्त आणि शेकडो महिलांच्या उपस्थितीत ही ज्योत पेटवून रथयात्रेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. राजमाता जिजाऊंच्या जन्मोत्सवासाठी ही ज्योत सिंदखेडराजा इथे, उद्या पोहोचणार असून, संपूर्ण जिल्हाभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

//<><><><><>//